मुख्यमंत्री ग्राम सडक योजना आशियाई विकास बँक (ADB) लोन क्र. ४०९७ (बॅच-२) बचतीमधून नाशिक विभागातील नाशिक जिल्ह्यातील ०२ पुलांच्या कामांस प्रशासकीय मान्यता देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**

**ग्राम विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः मुग्रायो-२०२५/प्र.क्र.३३३/बांधकाम-४**

बांधकाम भवन, ५ वा मजला, २५ मर्झबान पथ,

फोर्ट, मंत्रालय, मुंबई - ४०० ००१

**दिनांक** : १८ ऑगस्ट, २०२५.

**वाचा:**

१) **शासन निर्णय, ग्रामविकास विभाग क्रमांक:** मुग्रायो-२०२४/प्र.क्र. २९०/बांधकाम-४, दिनांक १२ जुलै, २०२४.

२) **ग्रामविकास विभाग पत्र क्रमांक :-** MMGSY-२०२१/CR ५१०/Bandh-४ दि. १६ मे, २०२५.

३) **मुख्य अभियंता (प्र.मं.ग्रा.स.यो.), महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, पुणे यांचे पत्र क्रमांक :** मुअ/प्रमंग्रासयो/१५७३ व १५७४/२०२५, दिनांक ०९ जुलै, २०२५.

**प्रस्तावना :**

मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत आशियाई विकास बँक अर्थसहाय्यित लोन क्र. ३८०५ (बॅच-१) २५ मिलीयन यु.एस. डॉलर व लोन क्र. ४०९७ (बॅच क्र. २) अंतर्गत ४७ मिलीयन यु.एस. डॉलर बचतीच्या विनियोगाबाबत केंद्र शासनाच्या आर्थिक व्यवहार मंत्रालय तसेच आशियाई विकास बँकेच्या सहाय्याने कार्यवाही करण्यास शासनाने उक्त अनुक्रमांक ०१ येथील शासन निर्णयान्वये मान्यता दिली आहे. शासनाने दि. १६ मे २०२५ रोजीच्या पत्रान्वये लोन क्र. ४०९७ (बॅच-क्र. २) अंतर्गत ४७ मिलीयन यु.एस. डॉलर्सच्या बचत रकमेतून १०८ पुलांची व ४८ रस्त्यांची कामे हाती घेण्याचा निर्णय घेण्यात आला असून शासनाने अनुक्रमे २८.७५ मिलीयन व ३४.२१ यु.एस. मिलीयन डॉलर व PISC ३.९० मिलीयन यु. एस. डॉलर्स अशा एकूण ६६.८६ मिलीयन यु.एस. डॉलर्स ची कामे केंद्र शासन व आशियाई विकास बँकेचे प्रकल्प अधिकारी यांना सादर केली आहेत. यामध्ये लोन क्र. ४०९७ (बॅच क्र. २) अंतर्गत बचत ४७.०० मिलीयन यु. एस. डॉलर्स व राज्य हिस्सा (३०%) १४.१० अशी मिळून ६१.१० मिलीयन यु.एस. डालर्स रकमेची कामे प्रस्तावित केली आहेत. तथापि पूर्वी या योजनेंतर्गत मंजूर कामापैकी वनविभाग मंजूरीविना व जमिन वादातून सुरु न झालेल्या कामांची होणारी बचत विचारात घेऊन एकूण ६६.८६ यु. एस. मिलीयन डॉलर्स ची कामे प्रस्तावित करण्यात आली आहेत.

**शासन निर्णय:**

मुख्यमंत्री ग्राम सडक योजना आशियाई विकास बँक (ADB) लोन क्र. ४०९७ (बॅच-२) बचतीमधून नाशिक जिल्ह्यातील पुलांच्या कामांस नावासमोर दर्शविलेल्या किंमतीस खालील नमूद केलेल्या अटींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | तालुका | पॅकेज क्रमांक | कामाचे नाव | पुलांची लांबी (मी.) | कामाची अंदाजित किंमत (रु. लक्ष) | ५ वर्ष देखभाल दुरूस्ती किंमत (रू. लक्ष) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | नाशिक | ADB-(II)-NAS-BR-०४ | सिद्ध पिंप्री (पिंपरी सय्यद) ओझर रस्त्यावर साखळी क्र . १/०९० येथे पुलाचे बांधकाम करणे | १०.०० | ९४.१७ | २.३९ |
| २ | येवला | ADB-(II)-NAS-BR-०५ | (TR-१२) देशमाने बु. शिरसगाव लौकी, लौकी शिरसगाव, आडगाव रेपाळे रस्त्यावर (VR-५३) साखळी क्र . १४/१७० येथे पुलाचे बांधकाम करणे | २४.०० | २२८.०८ | ४.८२ |
| **एकुण ०२ कामे** | | | | **३४.००** | **३२२.२५** | **७.२१** |

१. सदर कामे ग्राम विकास विभागाच्या अधिनस्त असलेल्या महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्थेमार्फत, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या धर्तीवर व ग्राम विकास विभागाच्या अटी व शर्तीवर कार्यान्वीत करण्यात यावीत.

२. मुख्य अभियंता (प्र.मं.ग्रा.स.यो.), पुणे, संबंधित अधीक्षक अभियंता (प्र.मं.ग्रा.स.यो.) व संबंधित कार्यकारी अभियंता (प्र.मं.ग्रा.स.यो.) यांनी शासन निर्णय ग्राम विकास विभाग क्रमांक ग्रासयो-२०१८/प्र.क्र.२३९/बांधकाम-१, दि.२५.१०.२०१८ अन्वये दिलेल्या अधिकारानुसार प्रत्येक रस्त्याला तांत्रिक मान्यता द्यावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था व मुख्य अभियंता तसेच संबंधित अधीक्षक अभियंता (प्र.मं.ग्रा.स.यो.) यांनी रस्त्याचे दर्जोन्नती करण्यासाठी ई-टेंडरिंग करुनच कार्यारंभ आदेश देण्यात यावेत.

४. प्रस्तुत कामास तांत्रिक मंजुरी देण्यापुर्वी व काम सुरु करण्यापुर्वी पुढील बाबींची पुर्तता करण्यात यावी.

   **i)** तांत्रिक मान्यता प्रदान करण्यापुर्वी पुलाची लांबी, रेखीय जलमार्ग (Linear Waterway) व Hydraulic Calculations पुन:श्च काटेकोरपणे तपासण्यात येऊन, त्याप्रमाणे संकल्पन निश्चित करण्यात यावे.

   **ii)** आवश्यकतेनुसार ३० मी. पेक्षा जास्त लांबीच्या पुलांचे संकल्पनास सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेनंतर सदर पुलाच्या कामास तांत्रिक मान्यता देण्यात यावी.

   **iii)** सदर पुलांच्या कामासाठी लागणारी जमीन या विभागाच्या ताब्यात आहे, याची खातरजमा करून घ्यावी. खाजगी जमीन अथवा वन विभागाची ना-हरकत प्रमाणपत्र आवश्यक असलेल्या पुलांची कामे हाती घेण्यात येऊ नयेत, याबाबत पुन:श्च खात्री करण्यात यावी.

iv) तांत्रिक मान्यता देणाऱ्या प्राधिकाऱ्याने हे काम कोणत्याही पाटबंधारे/जल विद्युत पाणीपुरवठा प्रकल्पाच्या जलाशयाखाली जाण्याची शक्यता नाही किंवा अशा प्रकल्पांमुळे या कामावर कोणताही परिणाम होणार नाही याची खात्री करावी.

v) अंदाजपत्रकामध्ये कामाची मराठीमधुन माहिती दर्शविणाऱ्या फलकाची तरतुद केलेली असावी.

vi) प्रशासकीय मान्यतेच्या अंदाजपत्रकात प्रत्येक दराचे वर्णन/दर/दर पृथ:करण/रक्कम/ दर पृथ:करणातील गृहित धरलेली अंतरे व अनुषंगिक इतर बाबी, तांत्रिक मान्यता प्रदान करण्यास सक्षम अधिकाऱ्यांनी त्यांच्या पातळीवर तपासणे अनिवार्य आहे. या संदर्भात शासनाचे कोणतेही उत्तरदायित्व असणार नाही.

vii) तांत्रिक मान्यता प्रदान करणाऱ्या सक्षम अधिकाऱ्याने कामामध्ये प्रस्तावित वाव अन्य कोणत्याही योजनेत/कार्यक्रमात समाविष्ट नाही तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद, महानगरपालिका, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ इत्यादी तत्सम यंत्रणेकडे मंजुर नाही याची खातरजमा करावी.

viii) सदर कामांची अंदाजपत्रके सन २०२३-२४ दरसूची आधारीत असून तांत्रिक मान्यता अद्यावत दरसूचीनुसार प्रदान करण्यात यावी.

ix) सदर कामांची नोंद मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेसाठी तयार करण्यात आलेल्या संगणक प्रणालीमध्ये संबंधित कार्यकारी अभियंता यांनी त्वरीत करावी.

x) सदर कामे डोंगरी/आदिवासी/नक्षल प्रभावित क्षेत्र अथवा साखर कारखान्यापासून १५ कि.मी. त्रिज्या क्षेत्रामध्ये शासनाच्या प्रचलित निर्णयानुसार येत असल्याबाबत तांत्रिक मान्यता प्रदान करणाऱ्या सक्षम अधिकाऱ्यांनी तपासणी करून दर पृथ: करणामध्ये त्यानुसार तरतूद केल्याबाबत खातर जमा करावी. याबाबतची सर्व जबाबदारी ही संबंधित तांत्रिक मान्यता प्रदान करणाऱ्या सक्षम अभियंत्याची राहील.

**५.** सदर कामावरील खर्च "मागणी क्र. एल-७, ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४, जिल्हा व इतर ग्रामीण मार्ग ३३७, रस्त्यांची बांधकामे (०२) बाह्य सहाय्यित प्रकल्प (०२) (०१) आशियाई विकास बँक सहाय्यित ग्रामीण रस्ते विकास पायाभूत सुविधा प्रकल्प (बाह्य हिस्सा ७० %) (कार्यक्रम) ५३ मोठी बांधकामे सीआरसी- ५०५४ ५२९८"तसेच "मागणी क्र. एल-७, ५०५४, मार्ग व पूल यावरील भांडवली खर्च ०४, जिल्हा व इतर ग्रामीण मार्ग ३३७, रस्त्यांची बांधकामे (०२) बाह्य सहाय्यित प्रकल्प (०२) (०२) आशियाई विकास बँक सहाय्यित ग्रामीण रस्ते विकास पायाभूत सुविधा प्रकल्प (राज्य हिस्सा ३० %) कार्यक्रम ५३ मोठी बांधकामे सीआरसी- ५०५४ ५३०४" या लेखाशीर्षाखाली दर्शविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०८१८११३७४१९२२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRASHANT VINAYAKRAO PATIL

Digitally signed by PRASHANT VINAYAKRAO PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=RURAL DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=2B1BAD66664B1E11E3BF66DB1D526143E814DB5F8C505422AF66A5628314537E, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9524CAB2D5A858B4A01FF72F5CAE5FDDC4F8C964F3AFC6B6249294AD88EC870D, cn=PRASHANT VINAYAKRAO PATIL
Date: 2025.08.18 13:06:28 +05'30'

**( प्रशांत पाटील )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. विधानसभा /विधानपरिषद सदस्य, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.

२) प्रधान सचिव (ग्रा.वि. व पं.रा.), बांधकाम भवन, मंत्रालय, मुंबई.
३) सचिव (मु.मं.ग्रा.स.यो.), ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) जिल्हाधिकारी, नाशिक.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक.
६) खाजगी सचिव, मा. मंत्री (ग्रा.वि.) मंत्रालय मुंबई-३२.
७) मुख्य अभियंता, (प्र.मं.ग्रा.स.यो.), महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, पुणे.
८) अधीक्षक अभियंता, (प्र.मं.ग्रा.स.यो.), महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, नाशिक.
९) कार्यकारी अभियंता, (प्र.मं.ग्रा.स.यो.), महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था, जिल्हा नाशिक.
१०) कार्यकारी अभियंता (बांध.), जिल्हा परिषद, नाशिक.
११) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक.
१२) जिल्हा कोषागार अधिकारी, नाशिक.
१३) माहिती तंत्रज्ञान अधिकारी, प्रधानमंत्री/मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, महाराष्ट्र राज्य.
१४) निवड नस्ती, कार्यासन बांध-४, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.